# प्रेस नोट

जा.क्र.स्था.गु.शा/ प्रेस नोट/ ८४ /२०२१
पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग
फॅक्स नं. ०२३६२-२२८२०५,
फोन नं. ०२३६२-२२८२०९
दिनांक - ०६/०१/२०२१.

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांचेकडून अंमली पदार्थ गांजा ची अवैध विक्री करणाऱ्या इसमाला रंगेहाथ पकडले.

सिंधुदुर्ग जिल्हा स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाला दिनांक ०५/०१/२०२१ रोजी वारगांव तालुका कणकवली येथील एक इसम गांजा विक्री करण्यासाठी घेऊन येणार आहे अशी गुप्त बातमी मिळालेली होती.

मा. पोलीस अधीक्षक श्री. राजेंद्र दाभाडे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. तुषार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागचे पोलीस निरीक्षक श्री. सुनिल धनावडे यांनी पोलीस उपनिरीक्षक श्री. सचिन शेळके, पोलीस अंमलदार रामचंद्र शेळके, प्रमोद काळसेकर, ज्ञानेश्वर कांदळगांवकर, प्रकाश कदम, चंद्रहास नार्वेकर यांचे एक पथक व पोलीस उपनिरीक्षक श्री. शाहू देसाई,पोलीस अंमलदार कृष्णा केसरकर, संकेत खाडये, रवि इंगळे, गुरुदास कोयंडे, चंद्रकांत पालकर यांची दोन स्वतंत्र पथके तयार केली.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने दोन्हीही पथकाने दिनांक ०५/०१/२०२१ रोजी सायंकाळी १८.४५ वाजल्यापासुन मौजे वारगांव- रोडयेवाडी तालुका कणकवली येथे विशिष्ठ पध्दतीने सापळा रचला होता. रात्रौ २१.०० वाजताचे दरम्यान बातमीदाराने दिलेल्या वर्णनाप्रमाणे गांजा विक्री करणारा इसम हा एक पिशवी हातात घेऊन एका घराचे अंगणात संशयितरित्या थांबलेला दिसून आला. म्हणुन त्यास २१.१० वाजता दोन्हीही पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्यास घेराव घालुन त्याच्याकडील पिशवीची खात्री केली. त्या पिशवीमध्ये ६७८ ग्रॅम ओलसर गांजा व १२ ग्रॅमच्या एकुण ४ प्लॅस्टीकच्या पुडया अशा एकुण ७२६ ग्रॅम वजनाचा गांजा ५००/- रुपये किंमतीचा डीजीटल इलेक्ट्रॉनिक्स वजन काटा आणि रोख रक्कम ५६०/- रुपये मिळून आले.

सदर आरोपीत यांने त्यांचे नांव - प्रविण आत्माराम गुरव, वय ५० रा. वारगांव, रोडयेवाडी तालुका कणकवली असे सांगितले. सदर आरोपी हा गांजा विक्री करण्याच्या उद्देशाने गांजा ताब्यात बाळगलेल्या स्थितीत रंगेहाथ मिळून आला. म्हणुन त्यास कणकवली पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचे विरुध्द गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क),२०(ब)(ii) (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास कणकवली पोलीस ठाणे करीत आहे.

( एस.के.धनावडे )
पोलीस निरीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यलय, सिंधुदुर्ग

प्रति,

मा. जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग